**<u>स.के.नं.३७०/२०२२ मध्ये नि.क्र.५ वर आदेश</u>.**

रोहन ललीतकुमार गांधी.

वि.

शमीम सैफुद्दीन सरखोत.

**(सीएनआर क्र.MHRG-13000-693-2022.)**

०१. फिर्यादी यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १४३ (अ) अन्वये सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. फिर्यादी यांनी आरोपी याच्या विरुध्द अनादरीत धनादेशाची रक्कम रुपये ३७,००,०००/– (रुपये सदोतीस लाख) ची वसुली करुन मिळण्यासाठी सदरचे प्रकरणत दाखल केले आहे. फिर्यादी यांना पैशाची अत्यंत गरज आहे व त्यामुळे त्यांनी चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १४३ (अ) अन्वये आरोपीकडुन धनादेशाच्या रकमेच्या २० टक्के अंतरीम रक्कम त्वरीत मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. आरोपीने सदर अर्जावर नि.क्र.१६ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. फिर्यादी व आरोपीमध्ये केसमध्ये नमुद केलेल्या कोणताही आर्थिक व्यवहार नव्हता. सदरचा धनादेश जरी आरोपीच्या व्यवसायाच्या 'शबीना पेट्रोल पंप'चा असला तरी तो धनादेश अगर दुसरा कोणताही धनादेश त्यांनी फिर्यादीला दिलेला नव्हता.

०४. त्यांनी त्यांच्या पेट्रोल पंपाच्या व्यवसायात नवीद अधिकारी रा. पनवेल यांना भागीदार म्हणुन घेतले होते व त्या संबंधीचा लेखी करार केलेला होता. शबीना पेट्रोल पंपाचे आर्थिक व्यवहार पेट्रोलियम पदार्थाच्या खरेदीची किंमत त्यांनाच 'शबीना ऑटोमोबाईल' या नावाने करावे लागत होते व ते केवळ त्या व्यवसाया करीता उघडलेले खाते होते व आहे. भागीदारी पत्रामुळे सदरच्या पेट्रोल पंपाची संपुर्ण देखभाल, हिशोब, खरेदी विक्रीचे सर्व व्यवहार नवीद अधिकारी पाहत होते. त्यामुळे त्यांनी देना बँकेचे चेक बुक स्वाक्ष–या करुन केवळ पेट्रोलियम कंपन्याना देण्याकरीता देवून ठेवलेले होते. सदरचे धनादेश फार पुर्वीचे आहेत. देना बँक ही बँक ऑफ बडोदा मध्ये दिनांक ०१/०४/२०१९ रोजी विलीन झाली व जुने धनादेश बँक बदलल्यामुळे ग्राहय पण धरले जात नाहीत.

०५. फिर्यादी यांनी नवीद अधिकारी याला व्याजाने रकमा दिल्या होत्या. फिर्यादी व्याजाने पैसे देण्याचा बेकायदेशीर व्यवसाय करतो. नवीद अधिकारी व फिर्यादी यांच्यामध्ये व्याजी पैशाचा व्यवहार होता ही गोष्ट त्यांना / आरोपीला प्रथम केसमधील नोटीस प्राप्त झाल्यानंतर समजली आहे.

०६. शबीना ऑटोमोबाईल्स हा पेट्रोल पंपाचा व्यवसाय आरोपीचे पतीचे नावे होता व त्यांच्या निधनानंतर सन २०११ पासून ते २०१५ पर्यंत त्यांचे जावई

तो व्यवसाय बघत होते. त्यानंतर सन २०१६ ते २०१८ मध्ये श्री. दुबे हे भागीदार होत. सन २०१८ मध्ये श्री. मुजफ्फर मुल्ला व श्री. बाळु दिवाण हे पेट्रोल पंपाचा व्यवसाय बघत होते. त्यांचा मॅनेजर म्हणुन नवीद अधिकारी तो व्यवसाय बघत होते. त्यानंतर सन २०२० पासून नवीद अधिकारी भागीदारात सदर व्यवसाय बघत होते. ते दरमहा पन्नास हजार रुपये आरोपीला देत होते. तसे त्यांनी भागीदारी पत्र तयार केले होते. त्यामुळे सन २०१६ पासून सदर व्यवसाय आरोपी बघत नाही याची जाणीव व कल्पना फिर्यादीला होती.

०७. फिर्यादी यांनी सदर प्रकरणात त्यांच्या भागीदारी संस्थेचे बँक अकाउंट खाते उतारे व वैयक्तिक बँकेतील खात्याचा (युनियन बँक) खाते उतारे हजर केलेले आहेत. त्यामध्ये सदोतीस लाख रुपये दिल्याचे दिसून येत नाही व आरोपीने त्याच्या खात्यात रकमा भरल्याचे देखील दिसून येत नाही. प्रस्तुतची केस भागीदारी व्यवसाया करीता दाखल केली आहे असे फिर्यादी म्हणत आहे परंतु त्याने त्याच्या वैयक्तिक खात्यातुन रकमा दिल्याचे दिसत आहे. सकृत दर्शनी फिर्यादीने रचना करुन आरोपीला या कसेमध्ये हेतुपुर्वक खोटा पुरावा तयार करुन गुंतवल्याचे दिसत आहे. त्यामुळे फिर्यादीने दाखल केलेला अर्ज फेटाळण्याची विनंती आरोपीने केली आहे.

०८. फिर्यादचे व कागदपत्रांचे अवलोकन केले. फिर्यादीने सदरची फिर्याद दिनांक २९/११/२०२२ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. प्रथमदर्शनी आरोपीने फिर्यादी यांना रक्कम रुपये ३७,००,०००/– चा धनादेश दिल्याचे दिसून येते. सदर प्रकरणातील धनादेशाची रक्कम ही काही लाखामध्ये आहे. फिर्यादी हा सदर धनादेशाची रक्कम मिळणेस पात्र आहे किंवा नाही ही बाब पुराव्या अंती ठरणारी आहे. या क्षणी त्याबाबतचा कोणताही विचार करणे योग्य ठरणार नाही. यदाकदाचित सदर प्रकरणाचा निर्णय आरोपीच्या बाजुने लागला तर आरोपीला त्याची अंतरिम रक्कम या कायदयातील तरतुदीनुसार परत मिळु शकते. त्यामुळे चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १४३ (अ) अन्वये फिर्यादीच्या सदर रकमेचे संरक्षण करणे आवश्यक वाटते. त्यामुळे चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १४३ (अ) विचारात घेता आरोपीला स्वतःला निर्दोष सिध्द करण्याची संधी आहे. त्यामुळे या क्षणी आरोपी याचे कडून फिर्यादी अंतरिम नुकसान भरपाई आदेश मिळण्यास पात्र आहे.

०९. सदरची रक्कम ही काही लाखांमध्ये आहे. त्यामुळे त्या रकमेची २० टक्के रक्कम देखील सदयस्थितीत आरोपीला झेपणारी नसल्याचे दिसून येते. त्यामुळे चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १४३ (अ) अन्वये फिर्यादीला अंतरिम नुकसान भरपाई म्हणुन धनादेशाच्या रकमेतील १० टक्के रक्कम देणे

न्यायोचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

–::– **आदेश** –::–

०१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. आरोपीने अनादरीत झालेल्या धनादेशाच्या रकमे पोटी १० टक्के अंतरिम रक्कम फिर्यादी यांना सदर आदेशा पासुन ३० दिवसांच्या आत दयावी.

०३. प्रचलित कायदया प्रमाणे आरोपीने सदरची रक्कम अदा करावी.

श्रीवर्धन.                ( सो. दि. जवळगेकर )
दिनांक – ०४/१२/२०२३        प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.